**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग-दोन**

सोमवार, दिनांक २८ जून,२०२१/आषाढ ७, शके १९४३.

संदर्भ : या सचिवालयाचे पत्रक भाग-दोन क्रमांक ४६, गुरुवार, दिनांक ६ मे, २०२१

**५७.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे आगामी द्वितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ व मंगळवार, दिनांक ६ जुलै, २०२१ असे दोन दिवस विधान भवन, मुंबई येथे होणार आहे. सदरहू अधिवेशनात प्रश्नोत्तरे, अर्धा-तास चर्चा व अन्य संसदीय आयुधे घेण्यात येणार नसल्याचे तसेच तारांकित स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यानुषंगाने द्वितीय (पावसाळी) अधिवेशनासाठी विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न तसेच कार्यवाहीत असलेले उर्वरित सर्व प्रश्न (अतारांकित स्वीकृत, वस्तुस्थितीचे प्रश्न) व्यपगत करण्यात आले आहेत.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : २८ जून, २०२१

राजेन्द्र भागवत,
सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
६) संगणक कक्ष (वेबसाईट)